<u>अहमदनगर येथे मा. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.३ यांचे न्यायालयात.....</u>

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१२७/२०२५ निशाणी क्र.११

| | | |
|---|---|---|
| १. गुन्हा घडलेली तारीख | - | २६/०५/२०२४ |
| २. गुन्हा दाखल तारीख | - | ३०/०१/२०२५ |
| ३. फिर्यादीचे नाव | - | महाराष्ट्र सरकार तर्फे व करीता भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन, अहमदनगर |
| ४. आरोपीचे नाव व पत्ता | - | अजीत प्रभाकर तारडे<br>वय ३० वर्षे, कामधंदा -मजुरी<br>रा. केंदळ बुद्रुक,<br>ता. राहुरी, जिल्हा अहमदनगर |
| ५. गुन्ह्याचा तपशील | - | |

तुम्ही दि.२६/०५/२०२४ रोजी दुपारी ०१-२७ वा.चे सुमारास राहुरी शहरामध्ये अहमदनगर ते मनमाड रोडवर अग्नीशामक कार्यालयाचे समोर फिर्यादी यांनी स्पीड ब्रेकर असल्यामुळे त्यांची पोलो कार क्र.के.ऐ.०५ एन.डी.१६१४ हिचा स्पीड कमी केला असता तुम्ही तुमचे ताब्यातील रिनॉल्ट कंपनीची क्वीड कार क्र.एम.एच.१७-ए.झेड.८४१० ही बेदरकारपणे किंवा हयगईने चालवुन फिर्यादीच्या कारला धडक दिली आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिताचे कलम २७९ खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

दुसरे असे की, तुम्ही वरील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही तुमचे ताब्यातील वाहन सार्वजनिक ठिकाणी तेथील परिस्थितीचा विचार न करता अशा पध्दतीने किंवा अशा वेगात की जेनेकरुन मानवी जिवीतास किंवा सार्वजनिक सुरक्षितता धोक्यात येईल आणि त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन कायदयाचे कलम १८४ सह कलम १७७ प्रमाणे शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

आणि मी याव्दारे असा निर्देश देतो की, उक्त दोषारोपावरून तुमची या न्यायालयाव्दारे संपरीक्षा करण्यात यावी.

PANKAJ HILAL PATIL
Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
Date: 2025.09.18 12:30:28 +0530

दिनांक १६/०९/२०२५
अहमदनगर

(पी. एच. पाटील)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.३, अहमदनगर